दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ५१ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.३० जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# थोड्याच दिवसात सुप्रिया सुळे देवेंद्र फडणवीसांच्या कामाचे कौतुक करतील

## त्यांनी महाराष्ट्राची बदनामी करु नये-चंद्रशेखर बावनकुळे



**नागपूर (वृत्तसंस्था)**

संजय राऊत यांनी जसे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचे कौतुक केले तसे थोड्या दिवसात सुप्रिया सुळेंही देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याची दखल घेत त्यांचे कौतुक करतील, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे ई आफीस चालवत आहेत. ते दावोसमध्ये असतानाही त्यांनी ई ऑफीसवरुन काम केले आहे. शासनाचे कुठलेही काम अडत नाहीये. राज्यात काय सुरू आहे यावर त्यांचे बारीक लक्ष आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सुप्रिया सुळे यांनी थोडा अभ्यास केला पाहिजे. ओडिसासोबत आपल्या राज्याची बरोबरी करत महाराष्ट्राची बदनामी करू नये. ज्या राज्यात राहतो त्यांची बदनामी करणे योग्य नाही. महाराष्ट्राचा आणि बाकीच्या राज्यांच्या विकास काय हे त्यांनी पाहिले पाहिजे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सुप्रिया सुळे महाराष्ट्रभर फिरत असतात त्यांना राज्य किती पुढे चालले आहे हे कळतं महाराष्ट्राने काय-काय योजना दिल्यात. देवेंद्र फडणवीस सरकार हे नीती आयोगाच्या सर्वेक्षणामध्येही पास होईल आणि सर्वात चांगले राज्य म्हणून काम करेल. सुप्रियाताईंनी राज्याची बदनामी करु नये. मविआच्या काळात किती जणांचे राजीनामे झाले हे सुप्रिया सुळेंना माहिती आहे. त्यांचे किती मंत्री डॅमेज होते. त्यांनी थोडे दिवस शांत राहून सरकारचे काम पाहावे. मग संजय राऊत यांनी जसे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचे कौतुक केले तसे थोड्या दिवसात सुप्रिया सुळेंही देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याची दखल घेत त्यांचे कौतुक करतील. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आम्ही राज्यात महायुती म्हणून लढणार आहोत. शेवटी त्या त्या भागातील कार्यकर्त्यांची जी भावना असते तीदेखील मांडवी लागते. आम्ही लोकसभा, विधानसभा महायुतीम्हणून लढलो. लवकरच आम्ही संपर्कमंत्र्यांची नेमणूक करणार आहोत. सरकार आणि भाजपचा समन्वय म्हणून ही नेमणूक करण्यात येणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या पक्षाच्या मंत्र्यांनी राज्यात जाऊन जनता दरबार घेतले पाहिजे. शेवटी सर्व मंत्र्यांनी जर जनता दरबार घेतले तर भलं कोणाचे होणार आहे. जनतेचेच होणार आहे ना. प्रत्येकाने जर लोकांसाठी काम केले तर जनतेची काम होऊन प्रत्येक जिल्ह्याचा विकास होईल.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, एकनाथ शिंदे काही नाराज नाही. त्यांना ठाण्यातून येण्यासाठी वेळ झाल्याने ते बैठकीला नव्हते. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. परवाच आम्ही अमित शहा यांच्यासह एका कार्यक्रमात उपस्थित होतो. ते नाराज नाहीत.

## सरकार म्हाडासाठी नवीन धोरण आणणार

### सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याचा प्रयत्न, गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदेंची माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**



सरकार म्हाडासाठी नवीन धोरण आणणार असून यामध्ये सामान्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. या नवीन धोरणात परवडणाऱ्या किमतीतील घरे, विद्यार्थ्यांसाठी आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी वसतीगृह त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांसाठी घरे आणणार असून समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून आम्ही निर्णय घेत असल्याचे शिंदे म्हणाले. यामध्ये गिरणी कामगार, पोलिस कर्मचारी यांसह मुंबईतील डबेवाल्यांचा विचार करतोय. सर्वसामान्य माणसाला घर मिळाले पाहिजे, अशी भूमिका महायुती सरकारची असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ३ हजार ६६२ घरांच्या सोडतीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. बुधवारी दुपारी शिंदे आणि उपमुख्यमंत्री, तसेच पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे मंडळाच्या ३ हजार ३६२ घरांसाठी सोडत काढण्यात आली. गृहनिर्माण तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, म्हाडाची घरे आज लोकांना मिळणार आहेत. २७०० घरे ही फर्स्ट कम फर्स्ट या योजनेमध्ये दिली आहे. ३ हजार ६६२ घरांची सोडत काढली आहे. या घरांसाठी ९० हजार अर्ज आले होते. ७१ हजार ग्राहकांनी त्याचे डिपॉझिट देखील भरले होते. यावरून म्हाडाच्या घरांची मागणी किती पटीने वाढतीये, हे दिसून येते. गेल्या दीड वर्षात म्हाडाने ३० हजार घरे दिली आहेत.

एकनाथ शिंदे म्हणाले, सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीमध्ये घरे देण्याचा निर्णय आम्ही घेतला होता. आज ६ हजारांपेक्षा जास्त लोकांना घरे मिळणार आहेत. ३ हजार ६६२ घरांची लॉटरी काढलेली आहे. त्यांनाही लवकरच घरे मिळतील. ५ फेब्रुवारी रोजी कोकण म्हाडाची लॉटरी आहे. त्यामध्येही नागरिकांना घरे मिळतील. म्हाडाचे घर घेण्याची प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन असून त्यात पारदर्शकता आहे. कुणी तुम्हाला म्हाडाचे घर मिळवून देतो, असे सांगत असेल, तर अशा भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना केले.

मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे रखडलेले प्रकल्प विविध सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून मार्गी लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार एमएमआरडीएच्या माध्यमातून घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगरमध्ये पहिला प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पुण्यातही रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## दिव्यांगांच्या न्यायहक्कांसाठी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचा धडक मोर्चा

**वर्धा । प्रतिनिधी**



राज्यात दिव्यांगांवर होणारे अन्याय आणि दुर्लक्ष याविरोधात प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन वर्धा यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनादरम्यान दिव्यांग बांधवांनी त्यांच्या न्यायहक्कांसाठी ठाम भूमिका मांडत विविध मागण्यांचे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांना दिले.

प्रमुख मागण्यांमध्ये दिव्यांगांना दरमहा ६००० रुपये पेन्शन लागू करणे, संत गाडगेबाबा दिव्यांग प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन उभारणे, दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र शिधापत्रिका वितरीत करणे आणि स्वयंरोजगारासाठी स्टॉल वाटप धोरण तयार करणे यांचा समावेश होता.

आंदोलनादरम्यान जिल्हाध्यक्ष प्रमोद कुऱ्हाटकार यांनी जिल्हास्तरीय समस्यांवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. जिल्हाधिकारी यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

सदर आंदोलनामध्ये प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कुऱ्हाटकर, संपर्क प्रमुख अमोद क्षीरसागर, महासचिव सुभाष इंगळे, उमेश खापरे, शैलेश सहारे, धनराज घुमे, रूपाली मडारे, आणि शेकडो दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.

आंदोलकांनी राज्य आणि जिल्हास्तरीय मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री आणि जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द केले असून, मागण्यांवर लवकर निर्णय घेतला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## मातोश्री महिला महाविद्यालयात विज्ञान विभागाच्या वतीने शैक्षणिक सहलीचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**



मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाटच्या विज्ञान विभागाने विद्यार्थिनींना वास्तविक जगाचे अनुभव देण्यासाठी 'लसनपूर' येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. या सहलीचे उद्दिष्ट विद्यार्थिनींमध्ये वैज्ञानिक कुतूहल, चिकित्सक वृत्ती आणि जीवन कौशल्ये विकसित करणे होते.

सहलीत प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणितशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि संगणकशास्त्र या विभागांच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विज्ञानातील विविध सिद्धांतांचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग कसा होतो, याचा अनुभव विद्यार्थिनींना या सहलीद्वारे मिळाला.

सहलीच्या आयोजनासाठी विज्ञान विभाग प्रमुख प्रा. शीतल धार्मिक यांच्या नेतृत्वाखाली प्रा. प्रणिता आष्टणकर, प्रा. तेजस्विता सहस्त्रबुद्धे, प्रा. अनुश्री भोयर, प्रा. कोमल नांदूरकर, प्रा. मोनाली त्रिवेदी, प्रा. दर्शना रेंढे, प्रा. हर्षदा राऊत, प्रा. वैदर्भी घुंगरूड, प्रा. स्नेहा सांगोले, प्रा. रोहिणी बोरकर, प्रा. समीक्षा पवार, प्रा. राकेश लोणकर, प्रा. किरण कष्टी, प्रा. मयुरी धोंडे आणि प्रा. श्रद्धा बोरकर यांचे योगदान लाभले.

सहलीत बी.एस.सी.च्या सर्व वर्षांच्या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला आणि विज्ञानाच्या विविध अंगांविषयी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेला सुचित करण्यांत येते की, खाली सही करणार अंकुश किसन आगलावे, रा. बोर्डा, तह. वरोरा, जि. चंद्रपूर यांनी मौजा उमरघाट, तह. मारेगांव, जि. यवतमाळ येथील शेत सर्व्हे नंबर ०८ पैकी आराजी ५.९३ हे. आर शेतीचे टोकन इसारपत्र दिनांक २८/११/२०२४ रोजी विकी सौदा प्रति एकरी ५,५०,००० अक्षरी रुपये पाच लाख पन्नास हजार प्रमाणे केला व विक्रेता अनिल मनोहरराव लुथडे व विलास अनिल लुथडे, रा. व्दारका नगरी, वरोरा, तह. वरोरा, जि. चंद्रपूर यांना टोकन रक्कम विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा वरोरा चा धनादेश कमांक ९५५४४३ अन्वये रुपये १,००,०००/- अक्षरी रुपये एक लाख चा दिला व विकी मुद्दत दिनांक १०/१२/२०२४ पावेतो ठरविली. मला दोन्ही विक्रेते यांनी दिनांक २८/११/२०२४ रोजी साक्षदार राहुल धनश्याम बलकी व प्रकाश धर्माजी राजुरकर रा. भालर यांचे समक्ष टोकन इसारपत्र लिहून दिलेले आहे.

टोकन इसारपत्रा नुसार विक्रेते हयांनी सदर मिळकतीची विक्री मुद्दतीत करुन दिली नाही. त्यामूळे मी सदर विक्रेते हयांचे विरुध्द मा. कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, केळापूर, जि. यवतमाळ येथे विशेष दिवाणी दावा कमांक ०२/२०२५ अन्वये दावा दाखल केला असून तो विद्यमान न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच मी सदर दावा विद्यमान न्यायालयात प्रलंबित असल्याबाबतची मा. दुय्यम निबंधक कार्यालय, मारेगांव येथे लिस पेंडन्सी नोटीस देखील रजिस्टर केला आहे.

तरी सदर विक्रेत्यांकडून माझे सोबत सौदा अस्तित्वात असतांना व दावा प्रलंबित असतांना कोणीही दावा मिळकत विकत घेवू नये. जर घेतल्यास सदर व्यवहारामूळे होणारे कोणतेही अधिकार संबंधीतांना प्राप्त होणार नाही. तसेच कोणत्याही बँकेने, पतसंस्थेनी किंवा इतर कोणीही खाजगी सावकारांनी सदर मिळकती मध्ये त्रयस्थ हक्क अधिकार निर्माण करु नये. सबब जाहीर नोटीस.

वरोरा
दिनांक :- ३०/०१/२०२५

नोटीस देणार
अंकुश किसन आगलावे

## 'त्या' निर्णयाविरोधात विमाशि संघाचे धरणे आंदोलन

### १ फेब्रुवारी २०२५ रोजी बोर्ड कार्यालयासमोर निदर्शने

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दहावी, बारावी परीक्षा केंद्रासाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती आस्थापनेतील केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य माध्यमिक - उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतचा निर्णय तात्काळ रद्द करण्याबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात नागपूर विभागीय बोर्ड कार्यालयासमोर १ फेब्रुवारी २०२५ रोजी धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.



राज्यमंडळ, पुणेचे अध्यक्ष यांच्या दि. १७/०१/२०२५ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र. २ नुसार राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यावर्षीपासून दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांना (आस्थापनाव्यतिरिक्त) अन्य शाळांमध्ये केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक म्हणून काम करावे यासाठीचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु, सदर निर्णय या ऐन परीक्षांच्या तोंडावर घेतल्याने शाळा, शिक्षकांची तारांबळ उडेल. सोबतच बाहेरील शिक्षक व कर्मचाऱ्यांना परीक्षा केंद्राच्या भौगोलिक परिस्थितीची, स्थानिक अडचणींची व आवश्यकतेची पूर्ण माहिती नसल्यामुळे परीक्षा व्यवस्थापनात अडथळा निर्माण होईल. एकीकडे शिक्षण विभाग ५ सप्टेंबर रोजी शिक्षकांचा सन्मान करतो तर दुसरीकडे सदर निर्णयावरून राज्यमंडळाचा राज्यातील शिक्षकांवर अविश्वास दिसतो आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे.हा निर्णय अनेक अडचणी निर्माण करणारा ठरतो आहे. त्यामुळे सदर निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात व विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने नागपूर विभागीय बोर्ड कार्यालयासमोर १ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत धरणे / निदर्शने आंदोलनकरण्यात येणार आहे.

या धरणे आंदोलनात विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन, राज्य शिक्षक मंडळ, विभागीय अनु. आ.आश्रमशाळा कर्म. संस्कृती संघटना व इतर समविचारी शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना सहभागी होणार आहेत.१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या धरणे / निदर्शने आंदोलनात नागपूर विभागातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय / जिल्हा / महानगर / तालुका पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे.

## अभिनेत्री ममता कुलकर्णी महामंडलेश्वर बनण्यावरून वाद वाढला

### जगद्गुरू महामंडलेश्वर हिमांगी सखी यांची नाराजी



**मुंबई । प्रतिनिधी**

अभिनेत्री ममता कुलकर्णीच्या महामंडलेश्वर बनण्यावरून वाद निर्माण झाला आहे. किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर हिमांगी सखी यांनी ममता कुलकर्णीच्या नियुक्तीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

ममता कुलकर्णी हि एक प्रसिद्ध अभिनेत्री असून, तिचं एक कालानुक्रमिक कनेक्शन डी-कंपनीसह आणि ड्रग्स प्रकरणामुळे तिची तुरुंगवास देखील झाली होती. मात्र, यानंतर ती किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर पदावर नियुक्त केली गेली, यावर हिमांगी सखी यांनी सवाल उपस्थित केला आहे.

हिमांगी सखी म्हणाल्या, ममता कुलकर्णीला अचानक महामंडलेश्वर बनवणे चुकीचे आहे. ती महाकुंभमध्ये संन्यास घेऊन किन्नर अखाड्याची महामंडलेश्वर बनली. तिच्या ड्रग्ज प्रकरणामुळे आणि तुरुंगात गेलेली असताना, कोणतीही चौकशी न करता तिला महामंडलेश्वर पद कसं दिलं?

त्यांनी पुढे सांगितलं, किन्नर अखाडा हा किन्नरांसाठी असावा, मग एका सामान्य महिलेला त्या अखाड्यात जागा कशी दिली?

हिमांगी सखी यांनी या प्रकरणावर गंभीर प्रश्न उपस्थित करत, तुम्ही कोणत्या प्रकारचा गुरू समाजाला देत आहात? असा सवाल देखील उपस्थित केला.

## जिवती तालुक्याच्या विकासासाठी सदैव तत्पर आहे;आ.सुधीर मुनगंटीवार यांनी दिला विश्वास

# जिवती येथील माता जंगोदेवी यांच्या यात्रेनिमित्त आयोजीत कार्यक्रमाला उपस्थिती






**जिवती । प्रतिनिधी**

जिवती तालुक्याने जेव्हा जेव्हा विकासकामांसाठी हाक दिली, तेव्हा तेव्ही मी खंबीरपणे पाठिशी उभा राहिलो आहे. आताही अनेक मागण्या आल्या आहेत. त्यांचा सकारात्मक विचार करून तालुक्याच्या विकासासाठी आणि येथील नागरिकांच्या जीवनात आनंद पेरण्यासाठी सदैव तत्पर आहे, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

जिवती येथील माता जंगोदेवी देवस्थानात पौष महिन्यातील यात्रेनिमित्त आयोजीत कार्यक्रमाला आ. सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. माता जंगोदेवीचे दर्शन घेऊन त्यांनी आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला आमदार देवराव भोंगळे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, आदिवासी चळवळीचे नेते जगन येलके, गणेश परचाके, विवेक बोढे, नामदेव डाहुले, हरीश ढवस, अजित मंगळगिरीवार, राहूल संतोषवार, विनोद देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार मुनगंटीवार म्हणाले, 'या स्थानावर येणारी व्यक्ती ऊर्जा आणि शक्ती घेऊन जात असते. माझी जंगो आईला एवढीच प्रार्थना आहे की, निवडणूक जिंकणे हे आमचे अंतिम ध्येय नसून आम्हा सर्वांना गोरगरिबांची, आदिवासी, ओबीसी, अनुसुचित जातींमधील बांधवांची मने जिंकण्याचा आशीर्वाद हवा आहे. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याची शक्ती हवी आहे.'

'आदिवासी बांधवांनी आम्हाला खूप प्रेम दिले. भरभरून आशीर्वाद दिलेत. म्हणूनच आमदार म्हणून याठिकाणी दर्शनाला आलो आहे. पौष महिन्यातील यात्रेचा आज शेवटचा दिवस आहे. दरवर्षी याठिकाणी श्रद्धा आणि भक्तीभावाने जात-पात न बघता अनेक लोक येतात आणि इथून जाताना ऊर्जा, शक्ती, आशीर्वाद घेऊन जातात, याचा मनापासून आनंद वाटतो. आज आपण सर्वांनी एकत्र येऊन माझे स्वागत केले आणि मला खूप प्रेम दिले, त्याबद्दल मन:पूर्वक आभारी आहे,' या शब्दांत आ. मुनगंटीवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या बैठकीची तारीख बदलली,४ फेब्रुवारीला होणार बैठक



**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रस्तावित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या कामाला गती देण्यासाठी नियोजित बैठक ३ फेब्रुवारीच्या ऐवजी ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालयातील जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात संपन्न होणार असल्याची माहिती मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी दिली.

पत्रकारांशी संवाद साधताना बागल म्हणाले की, योजनेच्या सर्वेक्षणाला गती मिळावी आणि ती लवकर मार्गी लागावी यासाठी जलसंपदा मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची व लोकप्रतिनिधींची स्वतंत्र बैठक आयोजित केली होती. मात्र, माननीय विखे पाटील यांच्या व्यस्त कार्यक्रमामुळे ३ फेब्रुवारीची बैठक पुढे ढकलण्यात आली असून ती आता ४ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

सदर योजनेच्या प्रगतीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरणार असून स्थानिक शेतकऱ्यांच्या हितासाठी योजनेला गती देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## गौंडरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी नागनाथ धोंडे बिनविरोध निवडले



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील गौंडरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी जयवंतराव जगताप यांचे कट्टर समर्थक नागनाथ धोंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

निवडीबद्दल जयवंतराव जगताप गटाचे सर्वेसर्वा व करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष जयवंतराव जगताप यांनी धोंडे यांचा सत्कार केला. यावेळी विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन महादेव धोंडे, एम. बी. हनपूडे, दत्तात्रय कापले, आदिनाथ सपकाळ, सुग्रीव गायकवाड, मनोहर ननवरे, हनुमंत लोकरे, सोसायटीचे अनिल सुरवसे, पाडळीचे चेअरमन शहाजी शिंगटे, दिगंबर रासकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## मेजर अशोक नाळे यांच्या स्मरणार्थ जिल्हा परिषद शाळेला वॉटर फिल्टर भेट

**सोलापूर । प्रतिनिधी**



मेजर अशोक नाळे यांच्या स्मरणार्थ प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नाळे वस्तीस वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. ही भेट बापूराव नाळे यांच्या वतीने देण्यात आली असून पिण्याच्या पाण्यासाठी लागणाऱ्या टाकीसाठी गणेश नाळे, जालिंदर नाळे, गोविंद नाळे, मधुकर नाळे, सतीश देवकते, रामदास नाळे, दादासाहेब नाळे आणि हनुमंत नाळे यांनी आर्थिक मदत केली.

कार्यक्रमास पोपट देवकते, नवनाथ नाळे, कारभारी येळे, लक्ष्मण नाळे, बाळू येळे, काशिनाथ नाळे, शिवाजी नाळे, अक्षय नाळे, परशुराम नाळे, सोमनाथ नाळे, मधुकर नाळे, गोविंद नाळे, ज्ञानेश्वर नाळे, अमोल नाळे, अमर बागडी आणि महिला पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष आकर्षण ठरले इयत्ता चौथीतील श्रेयस सतीश देवकते याने हार्मोनियमवर वाजवलेले राष्ट्रगीत, ज्याचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले. याशिवाय पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, आणि इंग्रजी भाषेतून मनोगते व्यक्त केली.

बाल आनंद बाजार भरविण्यात आला होता, ज्यामध्ये जास्त विक्री केलेल्या विद्यार्थ्यांना अनार्या कांबळे हिच्या वाढदिवसानिमित्त सतीश कांबळे व अनुराधा शिंदे यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य बक्षीस म्हणून वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांना सतीश देवकते यांच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक संतोष पोतदार यांनी मान्यवरांचे स्वागत केले, तर अनुराधा शिंदे यांनी आभार व्यक्त केले.

## सज्जनगड किल्ला सातारा येथे कचरा टाकल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशारा; याशनी नागराजन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा

**सातारा । प्रतिनिधी**

काल सकाळच्या प्रहरात सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सातारा पंचायत समिती गटविकास अधिकारी सतिश बुदधे, परळी पंचक्रोशीतील ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि दुर्ग नाद प्रतिष्ठानचे युवक यांनी सज्जनगड किल्ला सातारा येथे स्वच्छता अभियान राबवून कचरा गोळा केला.

या अभियानादरम्यान सज्जनगड किल्ला परिसरातील कचऱ्याचे ढिग पाहून याशनी नागराजन यांच्या संतापाला उधाण आले. सज्जनगड किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व असून, या किल्ल्याच्या स्वच्छतेसाठी परळी ग्रामपंचायतीने काय उपाययोजना केली आहे, असा प्रश्न त्यांनी सरपंचांकडून विचारला. याशनी नागराजन यांनी किल्ल्याच्या परिसरात कचरा टाकणाऱ्यांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्याची सूचना केली.

तसेच, त्यांनी सज्जनगड किल्ला प्लास्टिकमुक्त करावा, पर्यटकांसाठी स्वच्छतागृह, पाणपोई आणि बस स्थानकापासून गडावर सुविधांची व्यवस्था करावी, अशी सुचना परळी ग्रामपंचायतीला केली.

स्वच्छता अभियानाच्या सुरुवातीला कचरा पाहून नागराजन यांचा पारा चढला होता आणि त्यांनी परळी सरपंच बाळासाहेब जाधव यांना तात्काळ बोलावून उपाययोजना करण्याची सूचना दिली. त्यांनी वन विभाग आणि स्थानिक प्रशासनाला कचरा टाकणाऱ्यांविरुद्ध त्वरित कारवाई करण्याचा इशारा दिला आणि गडावर स्वच्छता अभियान सुरू करणे आणि वसुली प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले.

## बाबुराव पाटील महाविद्यालयाचा रा.से.योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचा उद्घाटन समारंभ संपन्न

**मोहोळ । प्रतिनिधी**



बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अँगार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन दि. २८ जानेवारी २०२५ रोजी मौजे गलंदवाडी, ता. मोहोळ येथे करण्यात आले. शिबीराचे आयोजन युथ फॉर माय भारत आणि डिजीटल लिटरशी फॉर युथ या ब्रिदवाक्याने प्रेरित होऊन करण्यात आले आहे.

या शिबीराचे उद्घाटन मोहोळचे पोलिस निरीक्षक श्री. हेमंत शेडगे यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते व साखर कारखान्याचे चेअरमन मा. बाळराजे पाटील हे होते.

श्री. हेमंत शेडगे यांनी आपल्या मार्गदर्शनात भारतातील तरुण पिढीला आदर्श नागरिक म्हणून घडवण्यासाठी व्यसनापासून दूर राहण्याची, मोबाईलचा वापर चांगल्या कार्यासाठी करण्याची आणि रस्ते विषयक नियम पाळण्याची गरज व्यक्त केली. तसेच, सायबर सेक्यूरिटी, स्वयंसेवक म्हणून कामे करणे आणि गुन्हेगारीपासून दूर राहण्याचे महत्त्व सांगितले.

यावेळी मा. बाळराजे पाटील यांनी शिबीरात भाग घेणाऱ्या सर्व स्वयंसेवकांना सात दिवस मोबाईलचा वापर न करता आदर्श काम करण्याचे आणि विविध मूल्ये जोपासण्याचे आवाहन केले. शिबीर हे एक अनुभवाची शिदोरी आहे, असे सांगत ते म्हणाले की, शिबीरातून मिळालेला अनुभव नागरिकांच्या स्मरणात कायम राहील.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश शेटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. महादेव चव्हाण आणि प्रा. डॉ. रविंद्र देशमुख यांनी केले.

शिबीरासाठी गलंदवाडी येथील ग्रामस्थ, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

## उर्स परिसराची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

# भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याची सूचना




**परभणी । लक्ष्मण उजगरे**

सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान असणाऱ्या शहरातील हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहाब रहे. (तुरतपीर बाबा दर्गा) उर्साच्या कालावधीत भाविकांना आवश्यक सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी आज खासदार फौजिया खान, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय पाटील यांनी आज दर्ग्याला भेट देऊन परिसराची पाहणी केली.

जिल्हाधिकारी यांनी भाविकांना कुठल्याही प्रकारे त्रास होणार नाही यासाठी अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या. ऊर्स परिसरात थाटण्यात येणाऱ्या दुकाना, रस्ते, वीज, पार्किंग, वाहतुक व्यवस्था, सी.सी.टिव्ही. अग्नीशामक पथक, स्वच्छता, आरोग्य पथक या सर्वांचे व्यवस्थापन नियोजनानुसार करावे. भाविकांना जाण्या-येण्यासाठी रस्ते रुंद ठेवावेत जेणकरुन मोठ्या प्रमाणात गर्दी होणार नाही. सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करुन घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी वक्फ बोर्ड, आरोग्य, महावितरण, अग्नीशामन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## गोधेगाव विविध कार्यकारी सोसायटीचे नवीन चेअरमन म्हणून पंढरीनाथ पठाडे यांची बिनविरोध निवड

**कोपरगाव । प्रतिनिधी**



गोधेगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदासाठी बापूसाहेब हरिभाऊ पठाडे आणि व्हा.चेअरमन सरस्वती उत्तम रांधवणे यांनी परस्पर समन्वयातून राजीनामा दिल्यामुळे नवीन निवडीसाठी प्रक्रिया पार पडली. रिक्त झालेल्या चेअरमन पदावर २४ जानेवारी २०२५ रोजी कोल्हे गटाचे पंढरीनाथ बाबुराव पठाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीसाठी सरस्वती रांधवणे यांनी सूचक आणि भानुदास कोळसे यांनी अनुमोदक म्हणून सहकार्य केले.

व्हा.चेअरमन पदासाठी काळे गटाच्या अरुणाबाई भाऊसाहेब भोकरे यांची निवड झाली. यावेळी सोसायटीचे सर्व सदस्य उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक ठोंबळ साहेब व राहणे साहेब (सहकार खाते) आणि शिवाजीराव दवंगे, तालुका सचिव कोपरगाव यांनी काम पाहिले. सचिव अशोक घेर व सहसचिव दत्तात्रेय कारभार यांनी सहकार्य केले.

या निवडीच्या वेळी कोल्हे गटाचे जनार्दन शिंदे, माधवराव रांधवणे, सुभाष कानडे, रवींद्र रांधवणे, बाबुराव रांधवणे, भाऊसाहेब शिरसाट, परजणे गटाचे सयाराम कोळसे, सुदामराव कोळसे, वाल्मीकराव भोकरे यांसारखे प्रमुख कार्यकर्ते आणि सोसायटीचे सभासद उपस्थित होते.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, मा.आ.स्नेहलताताई कोल्हे, युवानेते विवेक कोल्हे यांनी केले.

# हिंगणीच्या आदिवासी बाधवांच्या जमिनीचा प्रश्न मार्गी, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रयत्नांना यश

## अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर कोल्हे यांच्या प्रयत्नामुळे आदिवासी बांधवांची समस्या सुटली

**कोपरगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिंगणी येथील आदिवासी बांधवांना दैनंदिन उपजिवीकेसाठी माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांनी शासनस्तरावर प्रयत्न करून वनविभागाच्या जमिनी मिळवून दिल्या होत्या मात्र त्यावर पोटखराबा उल्लेख असल्यांने राष्ट्रीयकृत बँका या आदिवासी बांधवांना कर्ज तसेच आर्थीक सहाय मिळविण्यांत अडचणी येत होत्या त्यासाठी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी या समस्येचा पाठपुरावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्यांने प्रयत्न करून सदरचा प्रश्न मार्गी लावला आहे.

हिंगणी येथील आदिवासी बांधवांना मिळालेल्या वन जमिनीची सपाटीकरण त्याचप्रमाणे विद्युत मोटारी आदी बाबत संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी सर्वतोपरी सहकार्य केले त्यामुळे



आदिवासी बांधवांना या जमिनी अनेक वर्षे कसून त्यावर उपजीविका करता आली मात्र सदर जमिनीवर पोट खराब उल्लेख असल्याने त्याची कर्ज तसेच आर्थिक सहाय्य मिळणे कमी बँक स्तरावर सातत्याने अडचणी येत होत्या त्याबाबत युवानेते विवेक कोल्हे यांनी वस्तुस्थिती जाणून घेत यांप्रकरणी निर्माण होणा-या अडचणींचा अभ्यास करत त्यावर प्रांताधिकारी शिर्डी यांच्यापुढे संबंधीत आदिवासी बांधवांमार्फत अपिल दाखल केले होते, त्याचा नुकताच निर्णय होवुन त्यांनी या आदिवासी बांधवांना मिळालेल्या जमिनीवर पोटखराबा असलेला उल्लेख दुरूस्त दिला केला त्यामुळे आता आदिवासी बांधवांना या जमिनीवर राष्ट्रीयकृत बँकेकडुन पीक उत्पादन वाढीसाठी कर्ज, आर्थीक सहाय आदि लाभ घेता येणार आहे. या कामी कै. शांताराम चंदू बर्डे या आदिवासी लाभार्थ्यांनी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे व त्यानंतर बिपीनदादा कोल्हे यांच्यामार्फत सतत पाठपुरावा केला.

याबददल सर्व आदिवासी बांधवांनी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे व युवानेते विवेक कोल्हे यांचे आभार मानले आहे.

यांप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, संचालक विश्वासराव महाले, मनेष गाडे, आप्पासाहेब दवंगे, बाळासाहेब वक्ते, शिवाजीराव वक्ते, बाळासाहेब पानगव्हाणे, बापूसाहेब धर्मा पवार, सहकाररत्न शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाचे अध्यक्ष अंबादास देवकर, रामदास शिंदे, दादासाहेब पवार, एडवोकेट प्रभाकर सारजाराम पवार, रामभाऊ किसन चंदनशिव, लक्ष्मण किसन चंदनशिव, आप्पासाहेब धर्मा पवार, छगन दादा पवार, पांडू पुंजा मोरे, चिल्हाजी एकनाथ पवार, संतोष एकनाथ चंदनशिव सुभाष शांताराम बर्डे, दत्तात्रय पुंडलिक पवार, हिराबाई निवृत्ती माळी, दत्तात्रय प्रभाकर पवार, लक्ष्मण सोपान पवार,काकासाहेब भास्कर पवार, त्रिभुवन अण्णासाहेब पवार, सुरेश लक्ष्मण चंदनशिव आदि उपस्थित होते.

**जनसमस्या निवारण बैठक घेऊन युवानेते विवेक कोल्हे यांनी अनेक प्रश्नांना तडीस नेण्यासाठी केलेला पाठपुरावा हा नागरिकांना लाभदायक ठरला असून वर्षानुवर्ष रखडलेले आणि शासन दरबारी असणारे प्रश्न निकाली निघतात त्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर विश्वासाची आणि समाधानाची लकेर उमटते.**

# नव्या गंगापूर तहसील कार्यालयावर गुटखा व तंबाखू खाणाऱ्यांचा थुंकीचा डाग

## इमारतीसह स्वच्छतागृहांची दुरवस्था,शिधापत्रिका धारकांना त्रास

**गंगापूर । प्रतिनिधी**

आ. प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उभारलेल्या गंगापूर तहसील कार्यालयाच्या नव्या इमारतीचा प्रारंभ झाला असला, तरी काही नागरिकांच्या बेशिस्त वागणुकीमुळे या इमारतीचे सौंदर्य मळवले जात आहे. गुटखा व तंबाखू खाणाऱ्या नागरिकांनी कार्यालयाच्या पोर्चपासून स्वच्छतागृहापर्यंत थुंकीने रंगरंगोटी केली आहे. त्यामुळे इमारतीचे सौंदर्य हरवले असून, स्वच्छतागृह आणि वॉशबेसिन तुंबून घाण साचली आहे.

प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याने समस्या अधिक गंभीर झाली आहे. तसेच तहसील





कार्यालयात शिधापत्रिका धारकांना नावे टाकण्यासाठी व काढण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

**रजिस्ट्री कार्यालयाच्या स्थलांतराची मागणी, अन्यथा कुलूप ठोकण्याचा इशारा**

**नव्या तहसील कार्यालयात महसूल विभागाचे कामकाज सुरू झाले असले, तरी दस्तनोंद (रजिस्ट्री) कार्यालयाचे काम जुन्याच इमारतीत सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांना कामासाठी दोन ठिकाणी हेलपाटे मारावे लागत आहेत. पत्रकार सेवा संघाच्या वतीने रजिस्ट्री कार्यालयाचे कामकाज नव्या इमारतीत हलवण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा लवकरच तहसील कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा पत्रकार सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील झिंजुर्डे पाटील यांनी दिला आहे.**

# प्रा.डॉ.महेश निकत यांना महाराष्ट्र प्रेरणा पुरस्कार २०२५ जाहीर

**सोलापूर । प्रतिनिधी**

युवा महाराष्ट्र फाऊंडेशन या महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त आणि भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयात नोंदणीकृत संस्थेमार्फत दिला जाणारा प्रतिष्ठित महाराष्ट्र प्रेरणा पुरस्कार २०२५ प्रा. डॉ. महेश निकत यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.

प्रा. डॉ. महेश निकत हे ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट, करमाळाचे संस्थापक असून त्यांनी शिक्षण, सामाजिक कार्य, पर्यावरण संरक्षण, तसेच अपघातग्रस्तांसाठी तातडीची मदत यांसारख्या विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र प्रेरणा पुरस्कार



जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्काराचे स्वरूप फेटा, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल आणि मेडल असे आहे. हा पुरस्कार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी, गुरुवारी, बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे हसीनी सुधीर (दक्षिणात्य अभिनेत्री), विजय चौधरी (दयस्प, पुणे पोलीस), तृप्ती देसाई (भूमाता ब्रिगेड संस्थापिका), आणि मेघराज राजेभोसले (अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

साहित्य, कला, सामाजिक कार्य, शिक्षण, आरोग्य, पत्रकारिता, कृषी यांसारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करून त्यांचे कार्य पुढे आणणे हा युवा महाराष्ट्र फाऊंडेशनचा उद्देश आहे. विशेषतः समाजसेवेचे व्रत घेतलेल्या आणि निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाते.

प्रा. डॉ. महेश निकत यांच्या या निवडीबद्दल करमाळा तसेच संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# स्व.शुभमदादा संजय गदादे यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण व वाटप कार्यक्रमाचा सुंदर प्रारंभ

## मांडवगण फराटा येथे प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन

**शिरूर । रमेश बनसोडे**

स्व. शुभमदादा संजय गदादे यांच्या २९व्या जयंतीनिमित्त स्व. शुभमदादा गदादे फाउंडेशन व स्व. बबन अण्णा गदादे विचारमंच यांच्या वतीने मांडवगण फराटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षारोपण व वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य लक्ष्मण बापू फराटे यांच्या उपस्थितीत झाले. त्यांनी आपल्या मनोगतात झाडांच्या महत्त्वावर भर देत म्हटले की, झाड कधीच भेदभाव करत नाही. ते सर्वांना सावली व फळे देतं, अगदी निष्कपटीने. आपणही वैद्यकीय सेवा झाडाप्रमाणे निःस्वार्थपणे देण्याचा प्रयत्न करावा.




कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक हारी मामा फराटे यांनी या उपक्रमाचा पुढाकार घेतला होता. यावेळी वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या सचिव मृणाल ताई फराटे, भाजप किसान मोर्चाचे पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन मचाले, पंचायत समिती सदस्य राजेंद्र गदादे, वसंतराव फराटे कॉलेजचे उपाध्यक्ष पिंटू पाटील फराटे, अशोक आप्पा जगताप, प्रवीण जगताप, पत्रकार रमेश बनसोडे आणि राजेंद्र बहिरट हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान झाडांसाठी लागणारे खत गणेश जगताप यांनी पुरवले तर ठिबक सिंचनाची व्यवस्था बबन पाटोळे यांनी केली. वैद्यकीय अधिकारी डॉ. मुग्धा फटाले यांनी, मी व माझा स्टाफ झाडांची निगा राखण्याची पूर्ण जबाबदारी घेऊ, असे आश्वासन दिले.

कार्यक्रमात बाळू अण्णा चौधरी, हरीमामा फराटे, पांडुरंग फराटे, रामभाऊ यशवंते, गोरख शितोळे, आरोग्य सहाय्यक शिवाजी सांगळे, औषधनिर्माण अधिकारी स्वाती माने मॅडम, आरोग्य सेवक राजेंद्र काळे, श्रीरंग कापसे व वाहनचालक किरण गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप सर्वांनी एकत्र झाडे लावून केला, ज्यातून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

# जंजिरा आणि पद्मदुर्ग किल्ल्यांवर प्रजासत्ताक दिनी तिरंग्याचा सन्मान



**रायगड । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ऐतिहासिक जंजिरा आणि पद्मदुर्ग किल्ल्यांवर राष्ट्रध्वज फडकवून त्याला सलामी देण्यात आली. राज्य शासनाच्या आदेशानुसार मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील या किल्ल्यांवर ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

सकाळी ७.४५ वाजता पद्मदुर्ग किल्ल्यावर तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी नायब तहसीलदार संजय तवर, पद्मदुर्ग जागर संस्थेचे अध्यक्ष अशिलकुमार ठाकूर, माऊली कृपा जलवाहतूक संस्थेचे अध्यक्ष महेश देव-लाटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ७.३० वाजता जंजिरा किल्ल्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक अजितकुमार देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी मुरुड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, पुरातत्त्व विभाग मुरुड, सागरी सुरक्षा शाखा अलिबाग, तटरक्षक दलाचे अधिकारी व कर्मचारी, मत्स्य व्यवसाय विभाग मुरुड, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या वेळी ऐतिहासिक किल्ल्यांवर तिरंगा डौलाने फडकत होता, ज्यामुळे उपस्थितांमध्ये देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत देशासाठी अभिमान व्यक्त केला.

# आमदार राजेश विटेकर राष्ट्रवादी काँग्रेसच्या परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्त

**परभणी । प्रतिनिधी**

पाथरी विधानसभेचे आमदार राजेश विटेकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने २८ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आली.

राजेश विटेकर यांच्या या निवडीमुळे पक्षाच्या ग्रामीण भागातील संघटनाला बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



विटेकर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या ग्रामीण भागातील कार्यसंघटन अधिक बळकट होईल आणि स्थानिक समस्यांना प्राधान्याने हाताळले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मनोज जरांगे यांच्या उपोषणस्थळी मराठा समाजाच्या पाठिंब्यासाठी अन्न पुरवठा



**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने आज अंतरवाली सराटी येथे येणाऱ्या मराठा बांधवांसाठी अन्न पुरवठा पाठवण्यात आला. अंतरवली सराटी येथे महाराष्ट्रातील विविध भागांतील समाज बांधव या उपोषणस्थळी येत आहेत. त्यांच्या जेवणाची सोय व्हावी, या उद्देशाने गंगाखेड तालुक्यातील समाज बांधवांनी आज संध्याकाळी २०,००० ज्वारीच्या भाकरीबरोबर ठेचा आणि चटणीचा पुरवठा केला. या अन्न पुरवठ्याच्या वेळी गंगाखेड येथील समाज बांधव उपस्थित होते.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज स्व स्वरूप संप्रदायाचे कार्य प्रेरणादायी-विलासराव घुमरे

## पादुका दर्शन सोहळा करमाळ्यात उत्साहात संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या स्व स्वरूप संप्रदायाचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी केले. करमाळा येथे पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी सामाजिक उपक्रमांतर्गत २७ गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात २७ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या या भव्य पादुका दर्शन सोहळ्याला भाविक भक्तांची मोठी उपस्थिती लाभली. सकाळी छत्रपती चौकातून पादुकांची भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. मिरवणुकीनंतर पादुकांचे दर्शन व पूजन झाले.

विलासराव घुमरे म्हणाले की, जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराजांनी दिलेला जगा



आणि दुसऱ्याला जगवा हा संदेश मानव कल्याणासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या स्व स्वरूप संप्रदायामार्फत भक्तांना सन्मार्गाने जीवन जगण्याची प्रेरणा मिळत आहे.

सामाजिक कार्यकर्ते श्रेणीकशेठ खाटेर यांनी महाराजांचे कार्य महान असून, त्यांचे पादुका दर्शन हे करमाळा तालुक्यासाठी परमभाग्य असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी, जागृती दर्ण यांच्या प्रवचनातून भक्तीचे महत्त्व आणि स्व स्वरूप संप्रदायाचा मार्ग सुखी जीवनासाठी कसा आवश्यक आहे, यावर प्रकाश टाकण्यात आला.

सामाजिक उपक्रमांतर्गत गरजू महिलांना शिलाई मशीन वाटपाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलिंद फंड, डॉ. गजानन गुंजकर, दिग्विजय बागल, पृथ्वीराज पाटील, अंकुश जाधव, प्रशांत ढाळे, संतोष काका कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोलापूर जिल्हा सेवा समितीचे आबासाहेब शिंदे, देविदास ननवरे, रोहिणी सरडे, संतोष हंडाळ आदींनी परिश्रम घेतले.

शेकडो भाविकांनी पादुका दर्शन घेतले व उपासक दीक्षा स्वीकारली. पादुका दर्शन सोहळ्याने करमाळा तालुक्यात भक्तिमय वातावरण निर्माण केले

# स्वर्गीय वाल्मिक दादा नागवडे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर संपन्न

## प्रजासत्ताक दिनानिमित्त १११ रक्तदात्यांचा सहभाग

**शिरूर । प्रतिनिधी**



बाभुळसर (बु.), तालुका शिरूर, जिल्हा पुणे येथे स्वर्गीय वाल्मिक दादा नागवडे प्रतिष्ठान आणि नंदिग्राम ब्लड सेंटर अँड कम्पोनंट लॅब, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी २०२५ रोजी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये १११ रक्तदात्यांनी उत्साहाने रक्तदान केले.कार्यक्रमाचे उद्घाटन घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामचंद्र अण्णा नागवडे यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाला सरपंच दिपाली नागवडे, उपसरपंच मोहिनी रणदिवे, परिक्रमा शैक्षणिक संकुल उपाध्यक्ष हनुमंत पाटोळे, शिरूर तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बाळासाहेब नागवडे, बाभुळसर विका संस्थेचे चेअरमन भरत नागवडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस जयवंत नागवडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष सचिन मचाले, शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष आबासाहेब सोनवणे, तसेच ग्रामपंचायत सदस्य प्रणिती नागवडे, निरंजन नागवडे आणि अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरपंच दिपाली नागवडे, महेंद्र नागवडे, ग्रामपंचायत सदस्या प्रीती नागवडे, प्रियंका जगताप, शरद जगताप आणि त्यांच्या सपत्नीक जोड्यांनी रक्तदान करून स्तुत्य उदाहरण घालून दिले.रक्तदात्यांना ट्रॅकसूट आणि पैठणी साडी भेट देण्यात आली. रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी नंदिग्राम ब्लड सेंटरचे डॉक्टर विशाल भास्कर, डॉक्टर आकाश राठोड, डॉक्टर अच्युत जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे कार्य उल्लेखनीय ठरले. ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करून आभार मानले.माजी आमदार अशोक बापू पवार यांनी स्वर्गीय वाल्मिक दादा नागवडे यांच्या स्मृतींचा गौरव करत त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष सचिन मचाले यांनी निलेश मचाले यांच्या ५६ वेळा रक्तदान केल्याचा उल्लेख करत तरुणांना प्रेरणा दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन मचाले यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप नागवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नितीन आप्पा नागवडे यांनी केले.या शिबिरात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि सेवाभावी वृत्तीने रक्तदानाचे महत्व अधोरेखित झाले.

# वरोरा बाजारपेठेतील मुत्रीघर चोरी प्रकरण:नागरिकांमधून तीव्र संताप; निवेदन देत आंदोलनाचा इशारा

**वरोरा । प्रतिनिधी**



वरोरा शहरातील बाजारपेठेत असलेल्या सार्वजनिक मुत्रीघर चोरीला गेल्याच्या प्रकारामुळे स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित जागा लीज करून विक्री करण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणामुळे नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर आज (२८ जानेवारीला )वरोरा नगरपालिकेला निवेदन देण्यात आले. निवेदन देताना युवासेनेचे माजी जिल्हाप्रमुख मनीष जेठानी, राजू जाजुर्ले, प्रवीण सुराणा, नितेश जैसवाल, मनोज कोहले, विजय जुनघरे, जयंत मारोटकर, वैभव डहाणे, मुजब्बील शेख , सुभाष वावरे, पंकज पामप्ट्टीवार तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून चोरीला गेलेले मुत्रीघर पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. लीजसंदर्भात कोणतीही अनियमितता आढळल्यास ती तत्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. तसेच आरक्षित जागांची संख्या, लीज झाल्यास ठराव आणि फेरफारांची सत्यप्रत नागरिकांना उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

स्थानिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या प्रकरणात प्रशासनाने तत्काळ कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. कायदा-सुव्यवस्था बिघडल्यास जबाबदारी नगरपालिकेची असेल, असा इशाराही दिला गेला आहे.

या घटनेमुळे वरोरा शहरातील प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सार्वजनिक सुविधांबाबत होणाऱ्या हलगर्जीपणावर नागरिकांमधून रोष व्यक्त केला जात आहे. नगरपालिकेने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## शिवसेना तालुका मूल तर्फे एस.टी. दरवाढीचा जाहीर निषेध

# वाहतूक नियंत्रण बस स्थानक मूल यांच्यामार्फत राज्यपालांना निवेदन सादर

**मूल । प्रतिनिधी**




एस.टी. दरवाढीच्या विरोधात शिवसेनेच्या वतीने आज, २८ जानेवारी २०२५ रोजी, दुपारी १ वाजता मूल बस स्थानक येथे निषेध नोंदवण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदीप गीऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली, शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांच्या नेतृत्वात सरकारच्या या निर्णयाचा विरोध करण्यात आला आणि बस स्थानक प्रमुखामार्फत राज्यपालांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी शिवसेना तालुका संघटक रवी शेरकी, शिवसेना शहर प्रमुख बादल करपे, युवासेना शहर प्रमुख अमित ऐलानी, विभाग प्रमुख विनोद चलाख, शाखाप्रमुख मुकेश गांडलेवार, क्षितिज शेडमाके, उपशाखाप्रमुख क्रिशन शेडमाके, तसेच नरेश शेंडे, अतुल आत्राम, सुखदेव सिडाम, मोजेस आत्राम, ओमदास चलाख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेने एस.टी. भाडेवाढ सामान्य नागरिकांवर अन्यायकारक असल्याचे ठरवत, ही दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. या आंदोलनामुळे बस स्थानक परिसरात चांगलीच गर्दी झाली होती.

## शेंबळ येथे श्रीमद् भागवत सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

# आमदार करण देवतळे यांचा सत्कार;रस्ते विकासाचे आश्वासन

**वरोरा । प्रतिनिधी**



शेंबळ येथे दिनांक २२ जानेवारी ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान परमपूज्य श्री कृष्णकुमार पांडेजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने संपूर्ण गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

२७ जानेवारी रोजी गावकऱ्यांनी नवनिर्वाचित आमदार करण देवतळे यांचा सत्कार केला. यावेळी आमदार देवतळे यांनी गावकऱ्यांचे आभार मानले आणि आपल्या भाषणात शेंबळ-थोराना रस्ता व शेंबळ-करंजी रस्ता या दोन्ही रस्त्यांबाबत चिंता व्यक्त केली. हे रस्ते स्वर्गीय मंत्री संजयबाबू देवतळे यांच्या काळातील असून, मागील चार-पाच वर्षांपासून या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना ये-जा करणे कठीण झाले आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी दोन्ही रस्त्यांच्या दुरुस्तीचे आश्वासन दिले.

आमदार देवतळे यांनी परमपूज्य श्री कृष्णकुमार पांडेजी महाराज यांचे स्वागत करून त्यांचा आशीर्वाद घेतला. या कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळूभाऊ भोयर, सरपंच बालाजी पाटील जिवतोडे, उपसरपंच ज्योतीताई मेश्राम, तसेच ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि गावातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्ताहाच्या आयोजनाने गावकऱ्यांच्या धार्मिक भावनांना प्रेरणा मिळाली असून या कार्यक्रमाने गावात उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे.

# सिंदखेडराजा येथे जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्याची मागणी

## राष्ट्रीय नाभिक संघटनेची पालकमंत्र्यांकडे विनंती

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**



सिंदखेडराजा येथे वीररत्न जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा बसवावा, अशी मागणी राष्ट्रीय नाभिक संघटनेने पालकमंत्र्यांकडे केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू अंगरक्षक असलेल्या जिवाजी महाले यांनी स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देत ऐतिहासिक योगदान दिले आहे. होता जिवाजी म्हणून वाचले शिवाजी या जिजाऊंच्या शब्दांनी जिवाजी महाले यांचे पराक्रम इतिहासात अजरामर केले आहेत.राष्ट्रीय नाभिक संघटनेने जिवाजी महाले यांचा पुतळा सिंदखेडराजा येथील प्रवेशद्वाराजवळील टी-पॉइंटवर बसवण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ऐतिहासिक क्षणांचे स्मरण आणि जिवाजी महाले यांचे आदर्श विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत संघटनेने व्यक्त केले आहे.या मागणीसाठी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरिदास जाधव, जिल्हा मुख्य सचिव डॉ. प्रकाश सवडतकर, तालुका अध्यक्ष विलास चित्रे, शहराध्यक्ष प्रदीप जाधव, उपाध्यक्ष शिवाजी जाधव, विष्णू वैद्य, गजानन राऊत, राम राऊत, विजय बोबडे, रामेश्वर घाटोळकर, अमोल वखरे आणि इतर कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आणि भाषिक स्वातंत्र्याचा अविष्कार होता. या विचारांचा प्रसार करण्यासाठी आणि जिवाजी महाले यांच्या पराक्रमाचे स्मरण कायम ठेवण्यासाठी पुतळा बसवला जावा, अशी एकमुखाने मागणी करण्यात आली आहे.

सर्वधर्मीय आणि नाभिक समाजाच्या या मागणीला सरकारने सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी जनतेची अपेक्षा आहे.

# विश्वशांती विद्यालयात बाल आनंद मेळावा व स्नेहसंमेलनाचा उत्सव

**मूल । प्रतिनिधी**




मारोडा येथील विश्वशांती विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात २२ ते २५ जानेवारी २०२४ दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शाळा समितीचे अध्यक्ष सुनील बल्लमवार यांनी अध्यक्षीय भाषणात केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, नेताजी सुभाषचंद्र बोस, आणि माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन मारोडा ग्रामपंचायतीचे सरपंच भिकारी शेंडे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षपदाची धुरा सुनील बल्लमवार यांनी सांभाळली.

प्रमुख अतिथी म्हणून रितेश जिडगलवार, रेवताताई सोनुले (सरपंच भादुर्णी), पलिंद्र सातपुते (सरपंच उथळपेठ), संदीप आनंदपवार, रोहित कुमार, राहुल वाङगुरे, विलास कोडापे, सतीश खोबे, अशोक पुलावार, प्रेमदास गेडाम, अतुल कागदेलवार, आणि सुनील मंडलवार उपस्थित होते. पालक व विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करून उपस्थित मान्यवरांना भारावून टाकले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच त्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील येनगंटीवार यांनी केले, संचालन संदीप निमगडे यांनी तर आभार प्रदर्शन पुरुषोत्तम कुनघाडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ शिक्षक जीवन वाढई, मधुकर गेडाम, संदीप निमगडे, रोशन थोरात, विक्रांत पुद्दटवार, अक्षय येनुगवार, सुशांत आक्केवार, प्रियंका मिसार, शुभांगी पिपरे, शलाका बोरकर, ललिता मुस्कावार, निशांत कुनटावार, मनोज ताटकोंडावार, सुरेश सुमन्त्रावार, आणि निलेश अल्लूरवार यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी शाळा समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली

## व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी वरोरा येथील एस. ए. योगा इन्स्टिट्यूटच्या योगपटुंची निवड

**वरोरा । प्रतिनिधी**




नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत वरोऱ्यातील एस. ए. योगा इन्स्टिट्यूटच्या ११ योगपटूंकडून विविध योगप्रकार जसे पारंपरिक, रिदमिक आणि आर्टिस्टिकमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करून एकूण १२ सुवर्ण, रजत आणि कांस्य पदक प्राप्त केले. व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी या योगपटूंची सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे, यामुळे त्यांच्या कामगिरीला एक नवा दिमाख मिळाला आहे.

ही राष्ट्रीय योगासन स्पर्धा १७ ते १९ जानेवारी दरम्यान पश्चिम बंगाल येथील मेदनापूर येथे पार पडली.

दुव्यांशु निमजे - कांस्य पदक,शौनक आमटे - रजत पदक,रुद्राक्ष डांगरे - सुवर्ण पदक.ओंकार उत्तरवार - रजत पदक,अनिकेत देवगडे - रजत पदक.राम झाडे - १ सुवर्ण आणि १ रजत पदक,साहिल खापणे, श्रीकांत घानवडे, तनुजा आसुटकर, सई नेवास्कर, गायत्री पाल - प्रत्येकी १ सुवर्ण पदक.

हे सर्व योगपटू मागील ६ वर्षांपासून वरोरा तालुकाक्रीडा संकुलातील एस. ए. योगा इन्स्टिट्यूटमध्ये स्वप्नील पोहनकर व अनिकेत ठक यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहेत.

विजेत्या सर्व योगपटूंच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी त्यांच्या विजयाचे श्रेय त्यांचे योग प्रशिक्षक आणि पालकांना दिले आहे.

## ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहणार



**गंगापूर । प्रतिनिधी**

लासुर स्टेशन येथे पत्रकार सेवा संघाच्या वतीने आयोजित जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याला ग्रामीण पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांनी उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले आहे. पत्रकार सेवा संघाच्या गुणगौरव सोहळ्याला निमंत्रण देण्यात आले असून, विनय कुमार राठोड सर यांनी ते स्वीकारले आहे. कार्यक्रम रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ रोजी लासुर येथील जैन मंगल कार्यालयात होणार आहे.

यावेळी पत्रकार सेवा संघाचे मराठवाडा विभागीय राज्य अध्यक्ष गुलाब वाघ, उपाध्यक्ष फिरोज मन्सुरी, जिल्हाध्यक्ष रवींद्र सुरडकर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील झिंजुर्डे पाटील, जिल्हा सचिव गणेश म्हैसमाळे आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# कर्पूरी ठाकूर यांची जयंती उत्साहात साजरी



**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**

कर्पूरी ठाकूर यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक, राजकीय नेते आणि दोन वेळा बिहारचे मुख्यमंत्री राहिलेल्या कर्पूरी ठाकूर यांना जननायक म्हणून ओळखले जाते. भारत छोडो आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेल्या या थोर व्यक्तिमत्त्वाचे बहुमुखी योगदान विशेषत्वाने उल्लेखनीय मानले जाते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भीमराव मस्के यांनी कर्पूरी ठाकूर यांच्या आदर्श विचारांचे महत्त्व आजच्या काळातही किती मोलाचे आहे, यावर भाष्य केले. ओबीसी पदाधिकारी नंदकिशोर खरात, प्रकाश आढाव, संजय ठाकरे, सागर मेत्रे, उमेश खरात, सतीश पुरंदर, सतीश चौधरी, मोरया आकाश मेहेत्रे, भाग्यवान झोरे, बबन जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात राष्ट्रीय नाभिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरिदास जाधव, जिल्हा मुख्य सचिव डॉ. प्रकाश सवडतकर, विलास चित्रे, राम राऊत, गजानन राऊत, विष्णू वैद्य, रामेश्वर जाधव, विजय बोबडे आणि प्रदीप जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कर्पूरी ठाकूर यांच्या प्रतिमेचे वाटप करण्यात आले. बहुसंख्य समाजबांधवांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण केले आणि त्यांचा आदर्श घेतला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# अहिल्या नगर मधील सुपा येथे उत्पादन कार्याचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करार

## या भागात १२०० हून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील.



**अहिल्यानगर | शहाजी दिघे**

जागतिक स्तरावरील अग्रगण्य इंटिग्रेटेड अल्युमिनियम कास्टिंग फाउंड्री असलेल्या तॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्या नगर, महाराष्ट्र) येथील १२००००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा सामंजस्य करार वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये झाला, ज्यामध्ये माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि अन्य वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते. या सुविधेमुळे १२०० हून अधिक स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, या भागातील समुदायाच्या प्रगतीसाठी एक परिवर्तनकारी पाऊल उचलले गेले आहे.

श्री. भरत गिते, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, तॉरल इंडिया, या उपक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, महाराष्ट्रातील एका छोट्या शहरातून आल्यामुळे, मी नेहमीच टियर २ भागातील अफाट क्षमतेवर विश्वास ठेवला आहे आणि त्यांच्या प्रगतीसाठी संधी शोधण्याचा निर्धार केला आहे. २०२० मध्ये मी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींना भेटलो तेव्हा त्यांच्याशी या दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याचे भाग्य मला मिळाले आणि आज त्यांच्याच दूरदृष्टीमुळे हे स्वप्न साकार होत असल्याचे पाहून मला अभिमान वाटतो. या भागात जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञान विकसित करून, जागतिक दर्जाची पायाभूत संस्कृती प्रस्थापित करण्याचा आम्हाला विश्वास आहे. स्थानिक क्षेत्रामध्ये जागतिक कौशल्य आणि नवकल्पनांचे संयोजन करून, सुपाला उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे आणि या भागाच्या विकासासाठी नवीन मानके स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहोत.सुपा हे एक धोरणात्मक स्थान असून, प्रमुख बाजारपेठांच्या जवळ असल्यामुळे प्रगत उत्पादनाचे एक केंद्रबिंदू म्हणून ओळखले जाते. तॉरल इंडियाने या भागात विस्तार करण्याचा निर्णय घेतल्याने अहिल्या नगरच्या ऊर्जा, संरक्षण, एरोस्पेस, रेल्वे, सागरी, आरोग्यसेवा आणि इतर उच्च-विकास क्षेत्रांमध्ये भारताला पाठिंबा देण्याच्या क्षमतेवरील विश्वास दिसून येतो.अशी माहिती सह्याद्रीचा राखणदार कोपरगाव प्रतिनिधी प्रशांत टेके यांनी दिली.

# ढाणकी नगरपंचायतीमध्ये अग्निशमन वाहन दाखल

**उमरखेड | प्रतिनिधी**

ढाणकी नगर पंचायत होण्याआधी ढाणकी गावात आग लागल्यावर उमरखेड किंवा पुसद नगरपालिका मधून अग्निशमन वाहन बोलवावे लागत असे. त्यामुळे २०ते ६० किलोमीटर अंतरावरून अग्निशमन वाहन येईपर्यंत आगीत नुकसान होत होते. हे पाहता त्यावर सुरक्षेचा उपाय म्हणून स्थानिक पातळीवर अग्निसुरक्षा वाहन आवश्यक होते. ढाणकी नगरपंचायत होताच नगरपंचायत प्रशासनाने व नगर अध्यक्ष सुरेश जयस्वाल यांनी माजी आमदार नामदेवराव ससाने यांच्याकडे पाठपुरावा करून याबाबीचे गांभीर्य लक्षात आणून दिले.अग्नीशमन वाहन मिळणेकरीता आमदार




नामदेवराव ससाने यांच्या विशेष प्रयत्नातून ढाणकी नगरपंचायतला महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत नगरपंचायतीला अग्निशमन वाहन खरेदीकरीता रु. ८७ लक्ष निधी मंजूर झाला. या प्राप्त अनुदानातून नगरपंचायतमध्ये सदर वाहन दाखल झालेले आहे. ज्यामुळे स्थानिक आग नुकसानीच्या संकटावर मात करणे नगरपंचायत प्रशासनाला आता शक्य होणार आहे. त्यामुळे नागरीकांमधून समाधान व्यक्त होत आहे.आज दिनांक २७ जानेवारी ला उमरखेड मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांनी ढाणकी नगरपंचायत येथे अग्निशमन वाहनचे रिबीन कापून लोकार्पण केले.यावेळी मा.नगर अध्यक्ष सुरेश जयस्वाल, महेश पिंपरवार, रोहित वर्मा, संतोष पुरी, नगरपंचायत मुख्य अधिकारी गणेश चौधरी, दत्त दिगांबर वानखेडे, आनंदराव चंद्रे आणि सर्व नगरपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# समाजसेवा विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**तळोधी (बा.) | प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील समाजसेवा विद्यालयात शनिवार, २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावातून मतदार जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद सोरते होते. प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ शिक्षक जे. सी. बोरकर, पी. डब्ल्यू. भाकरे, डी. टी. बोरकर, एम. जी. देवेवार, एस. डी. साळवे, मयूर वाढई तसेच शिक्षिका सुकारे, मस्के आणि बोरकर आदी उपस्थित होते.

या प्रसंगी मुख्याध्यापक प्रमोद सोरते यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व आणि मतदार जनजागृतीबद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदानाच्या प्रक्रियेसंबंधी जागरूकता निर्माण करणे हा होता.

# पो.स्टे.पांढरकवडा हद्दीतील पाटणबोरी येथील कोल सीटी सोशल क्लब मध्ये अवैध जुगारावर धाड; ४५,२१,५४०/- रुपये जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई;३५ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद

**यवतमाळ | प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यात कोणत्याही प्रकारच्या अवैध धंद्यांना स्थान न देण्याच्या पोलिसांच्या निर्धाराच्या पार्श्वभूमीवर, पांढरकवडा हद्दीतील पाटणबोरी येथील कोल सीटी सोशल क्लब मध्ये अवैध जुगार खेळणाऱ्यांवर छापा टाकण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली असून ४५,२१,५४०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.यवतमाळ जिल्ह्यातील कोणत्याही अवैध धंद्याचा पर्दाफाश करणे आणि त्यावर कठोर कारवाई करणे ह्या उद्देशाने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहिती मिळवून पाटणबोरी येथील कोल सीटी सोशल क्लबमध्ये छापा टाकला.छापामारीत, बाहेर जिल्ह्यांतील तसेच शेजारील राज्यांतील जुगार शौकिन येथे जुगार खेळण्यासाठी आले होते. या कारवाईत ३५ आरोपी जुगार खेळताना सापडले. आरोपींच्या ताब्यातील नगदी रक्कम, जुगार खेळण्याचे साहित्य, २९ मोबाईल फोन, ६ चारचाकी वाहनं, इंग्रजी दारु आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला.जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण रक्कम ४५,२१,५४०- रुपये इतकी आहे. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे पोलीस ठाणे पांढरकवडा येथे कारवाई नोंदवण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. यशस्वी कारवाईत पोलीस निरीक्षक सतिश चवरे, सपोनि अजयकुमार वाढवे, विजय महाले, पोउपनि धनराज हाके, गजानन राजमल्लु आणि इतर सर्व पथक सदस्य सहभागी होते.

# पोलीस मित्र परिवार समन्वय समितीच्या वर्धा जिल्हा अध्यक्ष पदी डॉ. कपिल मून यांची निवड

**वर्धा | प्रतिनिधी**

शासन मान्यता प्राप्त पोलीस मित्र परिवार समन्वय समिती महाराष्ट्र राज्य यांच्या कडून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात संघर्षाची धडपड पाहून पोलीस प्रशासन, पोलीस परिवार व शासन यांच्यावर विविध प्रकारे होत असलेले अन्याय तसेचसर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी सहकार्य करून न्याय मिळवून देण्याकरिता वर्धा येथील डॉ. कपिल मून यांची फुले-शाहू-आंबेडकरी दलित विचारवंत आणिसामाजिक व लोककल्याणार्थ काम करण्याची तळमळ आणि मेहनत बघून पोलीस मित्र परिवार समन्वय समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संघपालजी उमरे यांच्या द्वारा डॉ. कपिल मून यांची वर्धा जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी पोलीस मित्र परिवार समन्वय समिती महाराष्ट्र राज्य यवतमाळ जिल्हा कार्याध्यक्षा जयाताई अराठे, पोलीस मित्र परिवार समितीच्यासर्व पदाधिकारी व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी डॉ. कपिल मून यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



# महिला महाराष्ट्र केसरी किताब २०२४/२५: भाग्यश्री फंड ठरल्या विजयी

**देवळी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळीच्या वतीने आयोजित 'महिला महाराष्ट्र केसरी किताब २०२४/२५' स्पर्धेचा समारोप शुक्रवार, २७ जानेवारी २०२५ रोजी विदर्भ केसरी खासदार रामदास तडस यांच्या उपस्थितीत झाला. स्पर्धेतील महिला महाराष्ट्र केसरी किताब साठी भाग्यश्री फंड (पुणे) आणि अमृता पुजारी (कोल्हापूर) यांच्यात रोमांचक लढत झाली. या लढतीत भाग्यश्री फंड विजयी ठरल्या आणि त्यांना महिला महाराष्ट्र केसरी किताब मिळविला, तर अमृता पुजारी उपविजेते ठरल्या.

विजेत्या भाग्यश्री फंड यांना महाराष्ट्राच्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री पंकज भोयर, राज्यसभा खासदार अनिल बोंडे आणि माजी खासदार रामदास तडस यांच्या हस्ते चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार राजेश बकाणे, आमदार प्रताप अडसर, आमदार सुमित वानखेडे, आमदार यावलकर, क्रीडा भारतीचे प्रसाद महानकर आणि राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस पै. योगेश दोडके यांची उपस्थिती होती. स्पर्धेत विविध वजन गटात झालेल्या लढतीत




अनेक कुस्तीगीरांनी प्रावीण्य सिद्ध केले. ५० किलो वजन गटात नंदिनी साळोखे (कोल्हापूर) प्रथम ठरल्या, ५३ किलो गटात स्वाती शिंदे (कोल्हापूर) प्रथम ठरल्या आणि ५५ किलो गटात सिद्धी ढमढेरे (पुणे शहर) यांनी विजय मिळवला. स्पर्धेच्या आयोजनासाठी डॉक्टर नरेंद्र मदनकर, नंदुभाऊ वैद्य, अंकित टेकाडे, सुनीता तडस आणि सरपंच सौरभ कडू यांचा मोठा सहभाग होता.

# छत्रपती शंभूराजे प्रतिष्ठान आयोजित रक्तदान शिबिरास २३१ रक्तदात्यांचा उच्चांकी प्रतिसाद

**शिरूर | रमेश बनसोडे**

छत्रपती शंभूराजे प्रतिष्ठान मांडवगण फराटा आणि पुना ब्लड बँक पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनानिमित्त माऊली मंदिर मांडवगण फराटा येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीरास प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, २३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानेश्वर माऊली प्रतिष्ठान, दादा पाटील फराटे मित्र मंडळ, वाघेश्वर लॉन्स, साईकृपा बिगरशेती पतसंस्था यांचे विशेष सहकार्य मिळाले. मांडवगण फराटा मित्र परिवाराने रक्तदात्यांसाठी जेवणाची सोय केली.

या शिबीराच्या आयोजनासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोहर फराटे, संदिप जगदाळे, योगेश फराटे, विकास फराटे, योगेशभैय्या फराटे, प्रताप फराटे पाटील, निलेश सोनवणे, आकाश सूर्यवंशी, ऋषी सकुंडे, जयदिप फराटे, शाहरुख सय्यद आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली. शिबीरास अनेक मान्यवरांनी भेट दिली, त्यात



ह.भ.प. सर्जेराव फराटे गुरूजी, घोडगंगा सहकारी साखर कारखाना संचालक दादा पाटील फराटे, शिरुर भाजपाचे तालुकाध्यक्ष आबासाहेब सोनवणे, आमदार माऊली कटके यांच्या सुविद्य पत्नी मनिषाताई कटके, रेखाताई बांदल संचालिका जिजामाता बँक मांडवगण फराटा, बाभुळसर बु. सरपंच दिपालीताई नागवडे, राजेंद्र गदादे सदस्य पं.स., लोकनियुक्त सरपंच समिक्षाताई फराटे, तसेच पत्रकार प्रमोद कुसेकर, रमेश बनसोडे इ. यांचा समावेश होता.

शिबीरात महिलांनी देखील रक्तदान केले. प्रत्येक महिला रक्तदात्यांना पैठणी साडी देऊन गौरवण्यात आले. या शिबीराचे हे १६ वे वर्ष असून, छत्रपती शंभूराजे प्रतिष्ठान हे सलग ११ वे वर्ष शिबीर आयोजित करत आहे

# बदलापूर शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर नगरपरिषदेचा हातोडा

## मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी अनेक अधिकाऱ्यांसह स्वत: रस्त्यावर उतरून केली कारवाइ

**बदलापूर | प्रतिनिधी**

बदलापूर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना, अनधिकृत अतिक्रमणही वाढले आहे. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेने सोमवारी अतिक्रमण विरोधी धडक मोहीम राबवली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी स्वयं रस्त्यावर उतरून या मोहिमेचे नेतृत्व केले.

या मोहिमेत जेसीबीच्या सहाय्याने दुकानांसमोरील कट्टे, दुकानाबाहेरील वाढवलेली छप्परे, फलक आणि अनधिकृत होल्डिंग्ज काढून टाकली. यामुळे रस्त्यांवर पदचाऱ्यांसाठी मोकळी जागा तयार झाली. बदलापूर शहरातील कात्रज भागातही अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

या कारवाईला फेरीवाले संघटनेचे निलेश येवले यांनी विरोध केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, अपुऱ्या पोलीस संरक्षणामुळे ही कारवाई तात्पुरती थांबवली गेली, परंतु काही दिवसांत पुनः ही कारवाई सुरू केली जाईल. निलेश येवले यांनी सरकारी कामात अडथळा आणल्यामुळे नगरपरिषद त्यांच्यावर कारवाई करू शकते, असे संकेत दिले आहेत.बदलापूर शहराचा विकास झपाट्याने होत आहे, त्याचप्रमाणे लोकवस्तीही वाढत आहे. त्यामुळे शहरातील रस्ते अपुरे पडत आहेत आणि वाढत्या अतिक्रमणामुळे नागरिकांना ट्राफिकसह इतर समस्यांचा सामना करावा लागतो. अनेक नागरिकांनी नगरपरिषदे कडे तक्रारी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी यावेळी सांगितले की, फेरीवाले, ट्राफिक, अनधिकृत बांधकाम आणि रात्रीच्या हातगाड्यांसंबंधी कारवाई सुरू आहे. पुढील आठवड्यापासून ही कारवाई नियमितपणे केली जाईल. आमचा उद्देश बदलापूर शहराला फेरीवाले-मुक्त, ट्राफिक-मुक्त आणि अतिक्रमण-मुक्त करणे आहे. जे अधिकृत फेरीवाले आहेत, त्यांचे पुनर्वसन सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार केले जाईल.

# शाहुपुरी पोलिस ठाण्यात तिघांवर मारहाण आणि दुकानाचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सातारा | किरण अडागळे**

शाहुपुरी पोलिस ठाण्यात तिघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. २४ जानेवारी रोजी रात्री शाहुपुरी चौक येथील उत्तम किराणा दुकान आणि पान दुकानावर झालेल्या मारहाण आणि नुकसान प्रकरणात या कारवाईला प्रारंभ झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीम खुदबुददीन पठाण आणि त्यांचे मित्र राज कोकरे हे आपल्या दुकानावर बसले असताना, सिगारेटच्या पैशावरून झालेल्या वादात अविनाश मारुती खवळे आणि त्याच्या दोन अनोळखी साथीदारांनी पठाण आणि कोकरे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याशिवाय, दुकानावर दगड फेकून दुकानाचे मोठे नुकसान केले.

या घटनेनंतर शाहुपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# भारत विद्यालय हिंगणघाट येथे मार्गदर्शन वर्गाचे आयोजन






**हिंगणघाट | प्रतिनिधी**

२८ जानेवारी भारत विद्यालय येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वर्गीय आप्पा जोशी न्यास, जिल्हा वर्धा यांच्या अंतर्गत मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेच्या तयारीबरोबरच पुढील शिक्षणासाठी आयआयटी आणि जेईई परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा वर्धा यांचे माननीय जिल्हा संघचालक जेठानंदजी राजपूत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मार्गदर्शनासाठी अनिकेत कश्यप सर आणि रुपेश हिवरकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षकांसह २५० ते ३०० विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

मार्गदर्शन सत्रात विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेची तयारी कशी करावी, वेळापत्रक कसे ठरवावे आणि नियोजनबद्ध अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. तसेच आयआयटी आणि नीट परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक अभ्यासपद्धती, विषयांची निवड आणि स्पर्धा परीक्षांतील संधींबाबत सखोल माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी माननीय जिल्हा संघचालक जेठानंदजी राजपूत यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या शिक्षक व व्यवस्थापनाच्या सहकार्याने करण्यात आले.

# ब्रम्हांड क्लासेसचा राज्यस्तरीय उत्कृष्ट क्लासेस म्हणून गौरव आणि पुरस्कार जाहीर

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील प्रसिद्ध ब्रम्हांड क्लासेसला उत्कृष्ट क्लासेस म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. वैजापूर तालुक्यातील विविध क्लासेसमध्ये ब्रम्हांड क्लासेसचे स्थान विशेष आहे. या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सुविधांचा पुरवठा केला जातो, ज्यामुळे हे क्लासेस इतर क्लासेसपेक्षा वेगळे ठरले आहेत.

ब्रम्हांड क्लासेसमध्ये डिजिटल बोर्ड, स्पेशल बँचेस, आयडी कार्ड आणि क्लासेसची स्वच्छता यासारख्या अत्याधुनिक सुविधांचा समावेश आहे. धोत्रे सर आणि भोकरे सर यांनी या सर्व सुविधांचा पुरवठा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विचार करत केला आहे.

उएढ, गएए, आर्मी, पोलीस, एनडीए यासारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये ब्रम्हांड क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा यशस्वी प्रवास सुरू आहे. अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षांमध्ये उच्च प्रमाणांक मिळवले आहेत, तसेच काही विद्यार्थी आर्मी, पोलीस आणि एनडीए मध्ये सहभागी देखील झाले आहेत.

सीईटी, नीट सारख्या परीक्षांमध्ये काही विद्यार्थ्यांनी अव्वल स्थान मिळवल्यामुळे क्लासेसचा लौकिक आणखी उंचावला आहे. यामुळे पालकांनी भोकरे




सर आणि धोत्रे सर यांचे अभिनंदन केले असून, पुढील यशासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. ९ फेब्रुवारी रोजी ब्रम्हांड क्लासेसला उत्कृष्ट क्लासेस म्हणून पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.